# जाहिर सूचना

**रत्नागिरी जिल्हयातील खाडीपात्रातील सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातुन नौकानयन मार्गसुकर करण्यासाठी वाळू/रेती निर्गतीसाठी खाडीपात्रातील डुबी/हातपाटीच्या रेतीगटातून रेती उत्खननाचे परवाने देणेबाबत.**

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि/१०/१०१४/प्र.क्र.५००/ख दिनांक २१/०५/२०१५ अन्वये वाळू/रेती निर्गती धोरणानुसार रत्नागिरी जिल्ह्यातील सन २०१८-२०१९ (दिनांक ३०/०९/२०१९) या कालावधीचे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड मुंबई यांच्या जलसर्व्हेक्षण अहवालानुसार सावित्री नदी/बाणकोट खाडी, जोग नदी/आंजर्ला खाडी, वाशिष्ठी नदी/दाभोळ खाडी, शास्त्री नदी/जयगड खाडी व काळबादेवी खाडीपात्रातील हातपाटी व डुबीद्वारे पारंपारिक पध्दतीने वाळु/रेती उत्खननासाठी चिन्हांकित केलेल्या विना लिलाव परवान्यासाठी राखीव असलेल्या रेती गटातील रेती उत्खननासाठी पारंपारिक पध्दतीने डुबी/हातपाटीद्वारे वाळू/रेती उत्खननाचा व्यवसाय करणा-या स्थानिक व्यक्ती/संस्थाकडून याद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

रत्नागिरी जिल्हयातील खाडीपात्रातील रेतीगटांचा सविस्तर तपशिल, विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रांची यादी जिल्हाधिकारी कार्यालय, (खनिकर्म शाखा) रत्नागिरी येथे उपलब्ध आहे. तसेच हातपाटी/डुबी रेती गटाचा सविस्तर तपशिल उपविभागिय अधिकारी/तहसिलदार कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व या कार्यालयाच्या https://ratnagiri.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. तरी इच्छुकांनी जिल्हाधिकारी कार्यालय जुनी प्रशासकिय इमारत, तळ मजला (खनिकर्म शाखा) येथे जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून अर्ज करावेत. ज्यांचे अर्ज परिपूर्ण असतील त्यांना रेती उत्खनन परवाने देण्यात येतील.

क्र.खनिकर्म/कार्या/२/हातपाटी परवाना/२०१८-१९
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
दिनांकः- २३/०१/२०१९

सही/- XXX
**(सुनील चव्हाण)**
**जिल्हाधिकारी रत्नागिरी.**

प्रतः- मा. विभागिय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.
प्रतः- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, रत्नागिरी जिल्हा परिषद रत्नागिरी यांजकडे माहितीसाठी.
प्रतः- उपविभागिय अधिकारी (सर्व ) यांचेकडे उचित कार्यवाही व नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी.
प्रतः- तहसिलदार (सर्व) यांचेकडे उचित कार्यवाही व नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी.
प्रतः- गट विकास अधिकारी (सर्व) यांचेकडे उचित कार्यवाही व नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी.

23.01.19
**जिल्हा खनिकर्म अधिकारी,**
**रत्नागिरी.**

## परिशिष्ट - ब

| अ. क्र. | वाळू गटाचे नाव | सन २०१८-२०१९ या वर्षामध्ये परवाना देण्यासाठी उपलब्ध साठा (ब्रासमध्ये) | सन २०१८-२०१९ साठी निश्चित केलेली लघुत्तम किंमत |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | **सावित्री नदी/बाणकोट खाडीतील गटांचा तपशिल** | | |
| १ | आंबेत ते दाभोळ गट Aa-1 चार्ट नं. १६६८ | ५४४५ | १७५६ |
| | **गट Aa एकूण** | **५४४५** | |
| | **जोग नदी/आंजर्ला खाडीतील गटांचा तपशिल** | | |
| २ | पाटीलवाडी ते सारंग गट C-१ चार्ट नं. १४३७ | १२७६५ | १६१९ |
| ३ | पाटीलवाडी ते सारंग गट C-२ चार्ट नं. १४३७ | २८७२८ | १६१९ |
| ४ | पाटीलवाडी ते सारंग गट C-३ चार्ट नं. १४३७ | ७५०९ | १६१९ |
| ५ | पाटीलवाडी ते सारंग गट C-४ चार्ट नं. १४३७ | १७९०४ | १६१९ |
| ६ | पाटीलवाडी ते सारंग गट C-५ चार्ट नं. १४३७ | १६८२९ | १६१९ |
| ७ | पाटीलवाडी ते सारंग गट C-६ चार्ट नं. १४३७ | १८०६५ | १६१९ |
| ८ | पाटीलवाडी ते सारंग गट C-७ चार्ट नं. १४३७ | १५०१८ | १६१९ |
| ९ | पाटीलवाडी ते सारंग गट C-८ चार्ट नं. १४३७ | १०२२८ | १६१९ |
| | **गट C एकूण** | **१२७०४६** | |
| | **वाशिष्ठी नदी/दाभोळ खाडीतील गटांचा तपशिल** | | |
| १० | करंबवणे ते गोवळकोट गट A-१ चार्ट नं. १६४२ | १५०१७ | १७४९ |
| ११ | करंबवणे ते गोवळकोट गट A-२ चार्ट नं. १६४२ | १५९०१ | १७४९ |
| १२ | करंबवणे ते गोवळकोट गट A-३ चार्ट नं. १६४२ | १४१३४ | १७४९ |
| १३ | करंबवणे ते गोवळकोट गट A-४ चार्ट नं. १६४२ | ६५९३ | १७४९ |
| १४ | करंबवणे ते गोवळकोट गट A-५ चार्ट नं. १६४२ | ८६९ | १७४९ |
| १५ | करंबवणे ते गोवळकोट गट A-६ चार्ट नं. १६४२ | ५३०० | १७४९ |
| १६ | करंबवणे ते गोवळकोट गट A-७ चार्ट नं. १६४२ | ९२०६ | १७४९ |
| १७ | करंबवणे ते गोवळकोट गट A-८ चार्ट नं. १६४२ | ११३०७ | १७४९ |
| १८ | करंबवणे ते गोवळकोट गट A-९ चार्ट नं. १६४२ | ८१२७ | १७४९ |
| १९ | करंबवणे ते गोवळकोट गट A-१० चार्ट नं. १६४२ | ७९५१ | १७४९ |
| २० | करंबवणे ते गोवळकोट गट A-११ चार्ट नं. १६४२ | ७०६७ | १७४९ |
| २१ | करंबवणे ते गोवळकोट गट A-१२ चार्ट नं. १६४२ | ४१५२ | १७४९ |
| २२ | करंबवणे ते गोवळकोट गट A-१३ चार्ट नं. १६४२ | ११९६५ | १७४९ |
| २३ | करंबवणे ते गोवळकोट गट A-१४ चार्ट नं. १६४२ | २३८५१ | १७४९ |
| २४ | करंबवणे ते गोवळकोट गट A-१५ चार्ट नं. १६४२ | २२०८५ | १७४९ |
| | **गट A एकूण** | **१७१५२५** | |

| | | | |
|---|---|---|---|
| **शास्त्री नदी/जयगड खाडीतील गटांचा तपशिल** | | | |
| २५ | चवे ते करजुवे गट A-१ चार्ट नं. १६३५ | २२९१८ | १६५१ |
| २६ | चवे ते करजुवे गट A-२ चार्ट नं. १६३५ | ६९५० | १६५१ |
| २७ | चवे ते करजुवे गट A-३ चार्ट नं. १६३५ | ४५८७ | १६५१ |
| | **गट A एकूण** | **३४४५५** | |
| **काळबादेवी खाडीतील गटांचा तपशिल** | | | |
| २८ | काळबादेवी खाडी मुख गट A-१ चार्ट नं. १३७५ | १८६३९ | १६१८ |
| २९ | काळबादेवी खाडी मुख गट A-२ चार्ट नं. १३७५ | २५९७२ | १६१८ |
| ३० | काळबादेवी खाडी मुख गट A-४ चार्ट नं. १३७५ | २७२९७ | १६१८ |
| ३१ | काळबादेवी खाडी मुख गट A-५ चार्ट नं. १३७५ | २७३८५ | १६१८ |
| ३२ | काळबादेवी खाडी मुख गट A-६ चार्ट नं. १३७५ | २७३८५ | १६१८ |
| ३३ | काळबादेवी खाडी मुख गट A-७ चार्ट नं. १३७५ | १९३४६ | १६१८ |
| | **गट A एकूण** | **१४६०२४** | |

क्र.खनिकर्म/कार्या/२/हातपाटी परवाना/२०१८-१९
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
दिनांकः- २३/०१/२०१९

सही/- XXX
**(सुनील चव्हाण)**
**जिल्हाधिकारी रत्नागिरी.**

# परिशिष्ट - अ

## सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून (Coastal Regulation Zone) नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी डुबी/हातपाटीद्वारे वाळू/रेती उत्खननावरील सर्वसाधारण निर्बंध व अटी/शर्ती

1) हातपाटीद्वारे वाळू उत्खनन करणेसाठी दिनांक 30/09/2019 पर्यतच्या मुदतीचे परवाने देणेत येत आहेत.

2) अर्जदार हा स्थानिक व्यक्ती/संस्था असणे आवश्यक आहे.

3) अर्जदार व्यक्ती/संस्था यांनी कमीत कमी 1000 ब्रास करीता वाळू उत्खननाचा परवाना घेणेसाठी अर्ज करणे आवश्यक आहे.

4) होडीचे प्रतीदिन 4 ब्रास उत्खननक्षमता गृहीत धरुन वाळू उत्खनन मागणी विचारात घेवून प्रत्येक परवानाधारकासाठी होडींची संख्या व त्या अनुषंगाने परवान्याची मुदत निश्चित करण्यात येईल.

5) होंडीची मंजुरी आगोदर महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचेकडून घेण्यात यावी. सदर मंजूरीसह जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वाळू उत्खनन वापरासाठी होडींचा प्रस्ताव सादर करावा. सदर प्रस्ताव प्राप्त झालेनंतर जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रत्येक होडींना विशिष्ट नंबर देण्यात येईल. तो नंबर होडीवर ठळक अक्षरात पेन्ट व रेडीअम स्टिकरने मोठ्या अक्षरात लिहिणे बंधनकारक राहील. त्यानंतर या कार्यालयाकडून प्राधिकृत अधिकारी नंबर पेन्ट व रेडीअम स्टिकरने नोंदविलेबाबत खात्री केलेनंतरच उत्खननासाठी अधिकृत परवानगी देण्यात येईल. सदरची होडी वाळू उत्खनना व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणांसाठी वापरता येणार नाही.

6) आदेशात नमुद केलेल्या होडी/बोटी व्यतिरिक्त अन्य होडी/बोटींचा वा बदली होडी/बोटींचा वापर करण्याचा नाही. बदली होडीचा/बोटीचा वापर करावयाचा झाल्यास त्यास जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी यांची पूर्व परवानगी घेणे परवानाधारकावर बंधनकारक आहे. जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगी शिवाय आदेशात नमूद केलेली बोट/होडी व्यतिरिक्त अन्य होडीचा/बोटीचा वापर केल्यास, त्या बोटीद्वारे/होडीद्वारे केलेल्या रेती उत्खननाचे परिमाण अवैध ठरविण्यात येईल व त्याबाबत नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

7) उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळू/रेतीची साठवणूक ठिकाणाचा लेखी तपशील (खाडी/नदीचे नांवे, गांवाचे नांव, स.नं./ग.नं., गांव नमुना नं. 7/12 चा उतारा, जमिन मालकांचे संमतीपत्र, तत्सम बाबी) अर्जदाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक राहिल.

8) परवानाधारकांने उत्खनन केलेली वाळू/रेतीची साठवणूक परवानाधारक यांनी अर्जासोबत जोडलेल्या बिनशेती प्लॉट मध्येच करावयाचा आहे. सदर प्लॉटची सीमा दर्शविणोर खांब उभारणे व फलक लावणे (विहीत केलेल्या नमुन्यात) उभारणे परवानाधारकावर अनिवार्य राहील. अशा प्लॉटची प्राधिकृत अधिकारी यांनी

तपासणी केलेनंतरच परवाना देण्यात येईल. मंजूर जागेव्यतिरिक्त अन्य ठिकाणी वाळू/रेती साठा करावयाचा असल्यास याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

9) कोणत्याही पूर्व परवानगीशिवाय सदर परवान्यातंर्गत उत्खनन केलेल्या वाळू/रेतीचा साठा उक्त अनुज्ञेय जमिनीचे क्षेत्राव्यतिरिक्त अन्य ठिकाणी केल्याचे निदर्शनास आल्यास सदरचा संपूर्ण वाळू/रेती साठा अवैध ठरविण्यांत येवून, त्याबाबत परवानाधारक व जमिन मालकासह सर्व संबंधितांवर फौजदारी, दंडनिय, योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशा वाळू/रेती साठयाची शासनाचे धोरणानुसार विल्हेवाट/निर्गतीची नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

10) वाळू/रेतीचे साठवणूकीसाठी वापरण्यांत येणारी प्रश्नाधीन जागेची सक्षम अधिकारी यांचेकडील बिनशेती परवानगी घेणे व अनुषंगिक आवश्यक ते शासकीय कर शासन जमा करणे परवानाधारक व संबंधित जमिन मालक/भोगवटादार यांना बंधनकारक आहे.

11) परवानाधारक यांना पर्यावरण विषयक व सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्राच्या नियमातील अधिनियम/नियमातील तरतूदींचे व सर्व संबंधित विभागाचे विहीत केलेले अटी/शर्तीचे पालन करणे बंधनकारक आहे.

12) वाळू/रेतीचे उत्खनन हे फक्त डुबी/हातपाटीद्वारे पारंपारीक साधनाचा वापर करुन करणे बंधनकारक राहील. <u>सक्शन पंप, ड्रेझर्स इत्यादी यांत्रिक साधनांचा वापर करता येणार नाही.</u> यांत्रिक साधनांचा वापर करुन वाळू/रेती उत्खनन केल्याचे आढळून आल्यास दिलेला परवाना रद्द करुन सदरचे उत्खनन हे अवैध ठरवून नियमानुसार कारवाई केली जाईल.

13) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी निश्चित केलेल्या खोलीपर्यंतच (3 मिटरपर्यंतच) लिलावधारक/परवानाधारकाला वाळू/रेतीचे उत्खनन करता येईल. विहित केलेल्या खोलीपेक्षा जास्त खोलीपर्यंत उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास परवाना रद्द करण्यात येईल. तसेच असे उत्खनन अवैध ठरवून नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

14) वाळू/रेतीचे उत्खनन सकाळी 6.00 ते सायंकाळी 6.00 या कालावधीतच करता येईल. या कालावधीनंतर केलेले उत्खनन अवैध समजून नियमानुसार कारवाई करण्यात येईल. वाळू उत्खननासाठी मंजूर केलेल्या होड्या संध्याकाळी 6.00 ते सकाळी 6.00 पर्यंत इतर कारणांसाठी वापरता येणार नाहीत.

15) वाळू/रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व परवानाधारकावर राहील. अशा हानीची/नुकसानीची परिगणना जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांच्याकडून करण्यात येईल व त्याबाबतचा त्यांचा निर्णय अंतिम राहील.

16) महाऑनलाईनने निर्माण केलेली मोबाईल आधारित सुलभ SMATS (Sand Mining Approval and Tracking System) प्रणालीनुसार लिलावधारकास त्याचे 3 मोबाईल नंबर रजिस्टर करणे बंधनकारक राहील.

17) परवानाधारकाने निर्धारित वाळूगटातून वाळूचे उत्खनन करुन प्रत्येक वाहनामधील वाळूचे परिमाण, वाहन क्रमांक, वाळूगटाचे नाव/क्रमांक, वाहन कोठून कोठे जाणार आहे, त्या दोन ठिकाणांमधील अंतर इत्यादी तपशिल नोंदणीकृत मोबाईलवरुन एसएमएसद्वारे (SMS) निर्दिष्ट क्रमांकावर कळविणे बंधनकारक राहील. SMATS प्रणालीकडून लिलावधारकास नोंदणीकृत मोबाईलवर त्याने केलेल्या विनंतीनुसार त्यास एसएमएसद्वारे टोकन नंबर प्राप्त होईल. असा टोकन नंबर प्राप्त झाल्याशिवाय वाळू/रेतीची वाहतूक करता येणार नाही.

18) सदर प्रणाली अंतर्गत वाळू/रेती वाहतूकीसाठी SMS द्वारे प्राप्त होणारा टोकन नंबर पांढ-या LEGAL साईज पेपरवर मोठया अंकात काळया शाईच्या मार्करने ठळकपणे नमूद करुन संबंधीत वाहनाचे काचेच्या आतून दर्शनी भागावर डाव्याबाजूस दूरवरुन स्पष्टपणे दिसेल अशा पध्दतीने लावणे परवानाधारक व वाहनचालक यांचेवर बंधनकारक आहे.

19) वाळू वाहतूक करणारे वाहन बंद पडलेस/विघाड झालेस तात्काळ तहसील कार्यालय येथे लेखी वाहन क्रमांकासह, दिनांक, वाहन बंद पडलेची वेळ व बंद पडलेचे ठिकाण, वाहनचालकाचा मोबाईल क्रमांक कळविणेत यावा. तसेच वाहन दुरुस्त केलेनंतरही वेळ, वाहन दुरुस्त केलेचे ठिकाण व दुरुस्त करणारे मेकॅनिक यांचे नांव व मोबाईल क्रमांक लेखी कळविण्यात यावा. या बाबी न कळविलेस सदर वाहनाचा वापर अवैध वाहतूक करणेसाठी करणेत आलेचे स्पष्ट होईल व त्यास संपूर्णत: वाळू उत्खनन परवानाधारक व वाहनमालक जाबाबदार राहतील व त्यांचेविरुद्द कायदेशीर कारवाई करणेस ते पात्र राहतील.

20) वाळू/रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनचालकाकडे वैध टोकन नंबर आहे किंवा नाही, याबाबतचे निरीक्षण संबंधित महसूल यंत्रणेकडून, नियुक्त भरारी पथकाकडून अथवा जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी नामनिर्देशन करतील अशा व्यक्तींकडून केले जाईल. अशा निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनचालकाकडे वैध टोकन नंबर आढळला नाही किंवा टोकन नंबरचा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

21) परवानाधारकाने त्यांच्या परवाना स्थळातील वाळू/रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनास वहनक्षमते इतक्याच परिमाणाची वाळू द्यावी. कोणतेही वाहन वाहनक्षमतेपेक्षा अधिक परिमाणाची वाळू/रेती वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण वाळू अवैध आहे असे समजून नियमानुसार कारवाई करण्यात येईल. तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीबाबत मोटर वाहन कायद्यानुसार खालीलप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

अ) सदर वाहनाचा वाहतुक परवाना पहिल्या गुन्ह्यासाठी 30 दिवस, दुस-या गुन्ह्यासाठी 60 दिवस व तिस-या गुन्ह्यासाठी 90 दिवस याप्रकारे निलबिंत करण्यात येईल.

ब) वाहन परवान्याबरोबर वाहन चालकाच्या लायन्सन्सवर मोटार वाहन कायद्यानुसार परिवहन विभागास प्राप्त अधिकारात सदर चालकाचे लायसन्स पहिल्या गुन्हया करीता सहा महिन्यांसाठी निलंबित केले जाईल, अशाच प्रकारचा दुसरा गुन्हा करतांना एखादा वाहन चालक आढळल्यास त्याचे ड्रायव्हिंग लायसन्स कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल.

क) वाळू/रेतीच्या अवैध उत्खनन/वाहतुक/साठवणूकीची प्रकरणे उघडकीस आल्यास व अशा प्रकरणी संबंधीत ठेकेदार/लिलावधारक/परवानाधारक/वाहनमालक/वाहनचालक दोषी आढळल्यास त्याच्या विरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 मधील नियम 48 (7) व (8) व महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे), नियम 1968 मधील नियम 9 मधील तरतूदीनुसार तसेच शासनाचे नियमानुसार कारवाई करण्यात येईल. प्रचलित नियमानुसार कारवाई करताना संबंधितांविरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम 379 प्रमाणे गुन्हा दाखल करणे, वाहन जप्त करणे इ. कारवाई करण्यात येईल. तसेच वाळू/रेतीचे अवैध उत्खनन/वाहतूक इत्यादीच्या अनुषंगाने दंडात्मक कारवाई करताना महसूल अधिकारी/कर्मचारी यांच्यावर हल्ले होत असल्याचे निदर्शनास आल्यास व अशा ठिकाणी संघटित गुन्हेगारीचे प्रकार आढळून आल्यास अशा संघटित गुन्हेगारी विरुध्द कायद्यातील तरतुदीनुसार मोक्कासारख्या अधिनियमान्वये कारवाई करण्यांत येईल.

22) या व्यतिरिक्त वाळू/रेती उत्खनना संदर्भात इतर अटी व शर्ती खालील प्रमाणे देण्यात आल्या असून, त्या परवानाधारकांवर बंधनकारक असतील.

i) परवानाधारकाने मंजूर क्षेत्रातून वाळू/रेती उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी घेणे बंधनकारक आहे.

ii) परवानाधारकाने वाळू/रेती उत्खनन करताना गावकऱ्यांच्या निस्तार हक्कांस/सार्वजनिक वहिवाटीच्या हिताच्या हक्कांस बाधा पोहोचविता कामा नये.

iii) परवानाधारकाने वाळू/रेतीचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक याबाबत दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर विहीत केलेले कागदपत्रे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरिक्षक, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, यांच्या कार्यालयातील आणि भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरीक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या निरिक्षणासाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन देणे अनिवार्य राहील.

iv) परवानाधारकाने रेती गटात उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या वाळू/रेतीचा मासिक अहवाल तहसील कार्यालय, उप विभागीय अधिकारी कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी, (खनिकर्म शाखा) येथे दरमहांच्या 5 तारखेपर्यन्त देणे बंधनकारक आहे. विहीत मुदतीत अहवाल व विवरणपत्रे सादर न केल्यास परवानाधारकावर दंडनिय कार्यवाही करण्यात येईल. ज्या परवानाधारकाकडून मासिक

विवरणपत्र विहित वेळेत सादर करण्यात येणार नाही, त्यांनी अटी व शर्तीचा भंग केला आहे असे गृहीत धरणेत येईल व त्यांच्याविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

v) सदर नोंदवह्या जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचेकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक राहतील. प्रमाणित केलेनंतरच सदर नोंदवही वापरता येईल.

vi) वाळू/रेतीची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लॅस्टिक पेपरने/ताडपत्रीने आच्छादित करुनच वाहतूक करणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास वाहतूक करणेत येणारी वाळू अवैध समजून नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

vii) वाळू/रेतीचे उत्खनन अथवा वाहतुक करताना अपघात झाल्यास परवानाधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात व तहसील कार्यालय/जिल्हा खनिकर्म कार्यालय यांना देणे बंधनकारक राहील.

viii) परवानाधारकास करारनाम्यातील अटी व शर्तीचे, गौण खनिज उत्खनन नियमातील तरतूदींचे आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 मधील लागू असलेल्या तरतूदींचे व सर्व संबंधित अधिनियम/नियम इ. मध्ये विहीत केलेल्या तरतुदींचे/अटीशर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारक/परवानाधारकाने वाळू/रेतीचा उपयोग गौण खनिज म्हणूनच केला पाहिजे.

ix) वाळू/रेतीचे उत्खनन करतेवेळी काही प्रमुख खनिज आढळून आल्यास संबंधित परवानाधारकाने मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांना सात दिवसात कळविणे बंधनकारक राहील.

x) परवाना दिलेल्या क्षेत्रातून करारनाम्यात नमूद केलेल्या कालावधीत, मनुष्य बळाच्या सहाय्यानेच वाळू/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी परवानाधारकाची राहील. **यांत्रिकी बोट वापरण्यात येवू नये.** केंद्र शासनाच्या दिनांक 08-11-2011 च्या अधिसूचनेप्रमाणे कार्यपध्दती अवलंबून उत्खनन करावयाचे असून त्याकरीता यांत्रिकी बोट वापरण्यात येवू नये. तसेच उत्खनन हे फक्त मनुष्यबळानेच ("Sand collection in non-mechanised dinghies or small boats using baskets/buckets by human beings") करावे. नदी/खाडीतील उत्खनन करण्यास शासनाच्या धोरणानुसार संक्शन पंप पध्दतीचा अवलंब करण्यास सक्त मनाई केलेली आहे. परवानाधारकास/ठेकेदारास उत्खननाची अनुमती मिळाल्यानंतर उत्खनन करताना उत्खनन मार्गाच्या लगतच्या भागामध्ये पर्यावरण विषयक कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही हयांची दखल घेण्यात यावी. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत अशा तसेच मानवी वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळू गट बदलून दिला जाणार नाही.

xi) उत्खनन केलेल्या वाळू/रेतीची साठवणूक, लिलाव/परवाना ज्या जिल्ह्यातील असेल त्याच जिल्ह्यात करावी लागेल व त्यासाठी अकृषक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी परवानाधारकाची असेल. वाळू/रेती ठेक्याची/परवान्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू/रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळू/रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर 10 दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल. अशा वाळू/रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत परवानाधारकास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा दाखल करता येणार नाही. तसेच परवान्याचा कालावधी संपल्यानंतर तसेच वर उल्लेखित 10 दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू/रेतीचा साठा करण्यास परवानगी दिली जाणार नाही किंवा त्याच्या वाहतुकीसाठी दुय्यम वाहतूक पासेस देण्यात येणार नाहीत.

xii) सदर परवान्याचा कालावधी संपुष्टात आल्यावर, अर्जदार यांना आणखी वाळू/रेती साठा उत्खनन व विक्री/वाहतूक करण्यासाठी परवाना आवश्यक असल्यास, सदर परवान्यांर्गत अर्जदार यांना पुन्हा नव्याने अर्ज फि भरुन अर्ज करुन परवाना मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. परवाना मंजूर करुन न घेता परवानगी नसताना, वाळू/रेती उत्खनन केल्यास परवानाधारक फौजदारी कार्यवाहीस व दंडनीय कार्यवाहीस पात्र राहिल.

xiii) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडील जल सर्वेक्षण नकाशामध्ये विहीत केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातील व विहित केलेल्या खोलीपेक्षा जास्त खोलीपर्यंत वाळू/रेतीचे उत्खनन करता येणार नाही. इतर खाजगी व्यक्तींच्या खाजगी मालकीच्या जमिनीतून, अशा जमिनी परवाना देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी, वाळू/रेती उत्खनन करता येणार नाही. रस्ते/पायवाट म्हणून वापरण्यात येणा-या जमिनीतून वाळू/रेती उत्खनन करता येणार नाही. असे उत्खनन अवैध ठरवून नियमानुसार कारवाई करण्यांत येईल.

xiv) डूबी/हातपाटीद्वारे वाळू/रेती उत्खनन परवानाधारक यांना महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांजकडील दिनांक 04/09/2017 व 06/10/2018 च्या नाहरकत दाखल्यातील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक आहे.

xv) जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगी शिवाय परवानाधारकास परवाना दुसऱ्या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुसऱ्या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा भागीदारही घेता येणार नाही.

xvi) मा. सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक 27/02/2012 रोजी दिलेल्या आदेशानुसार वाळू/रेती उत्खननासाठी निश्चित करण्यांत आलेल्या गटातून जास्तीत जास्त 3 मीटर किंवा पाण्याची पातळी यापैकी जे कमी असेल तितक्या खोलीपर्यंत परवाना धारकाला वाळू/रेती उत्खनन करता येईल.

xvii) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांजकडील पत्र जा. क्र. ममेबो/मुकाअ/जआ/टी-94 Vol.X/हातपाटी उत्खनन-रत्नागिरी/2016-17/704 दिनांक 27-10-2016 च्या पत्रानुसार हातपाटी पध्दतीने उत्खनन करणा-या संबंधित कर्मचा-याकडे आधारकार्ड (Unique Identification Number) असणे बंधनकारक राहील.

xviii) परवान्यातील अटी व शर्तीमध्ये दुरुस्ती करण्याचा/बदल करण्याचा तसेच नविन अटी व शर्तीचा समावेश करण्याचा संपुर्ण अधिकार जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी हे राखून ठेवीत आहेत.

23) वाळू / रेती वाहतूकीसाठी वाहतूक पासबाबत महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक गौखनि-10/0216/प्र.क्र.158/ख, दिनांक 22.03.2016 नूसार शासनाच्या वतीने वाहतूक पास (Transport Permit) छापून घेण्यासाठी शासनाने जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्यानूसार जिल्हाधिकारी यांनी वाळूच्या वाहतूकीसाठी आवश्यक तेवढे वाहतूक पास छापून घेवून संबंधित परवानाधारकास टप्याटप्याने वापरण्यास द्यावयाचे आहेत. परवानाधारकाने त्यांना प्राप्त झालेले वाहतूक पास वापरल्या संबंधिचा अहवाल सादर केल्यानंतरच पुढील वाहतूक पास देण्यात येतील. तसेच वाळू / रेती वाहतूकीसाठी वाहतूक पासेस देण्याबाबत केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक काआ 141(अ), दिनांक 15.01.2016 मधील परिशिष्ट 12 मध्ये नमूद केलेली असून सदर कार्यपद्धतीचा अवलंब करणे परवानाधारकावर बंधनकारक राहील.सदर कार्यपद्धती थोडक्यात खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

1. वाहतूक पासेस (रॉयल्टी पासेस)ची वैशिष्टे खालीलप्रमाणे असतील.
   - अ) इंडीयन बँक असोशिएशन ने प्रमाणीत केलेल्या चुंबकीय शाईने वर्णाची ओळख (MICR- Magnetic ink Recognition) होईल अशा पेपरवर छापील केलेले असतील.
   - आ) त्यावर अद्‌वितीय (विशिष्ट) बारकोड (Unique Barcode) असेल.
   - इ) अद्‌वितीय (विशिष्ट) बारकोड हा जलद प्रतिसाद (Quick Response) देणारा असेल.
   - ई) सदर बारकोडमध्ये अदृश्य असे चिन्ह (Invisible Mark) असेल.
   - उ) सदर बारकोडमध्ये वॉटर मार्क (Water Mark) असेल.
   - ऊ) वाहतूक पासेस हे फरारी शाईच्या पार्श्वभूमीचे (Fugituve Ink Background) असतील.
2. वाळूपट्टा स्थळावर परवानाधारकाने साठ्यांच्या ठिकाणी ठेक्यावर **Halogen Lights** बसविणे आवश्यक राहील. **Halogen Lights** अशा पद्धतीने बसवावे की त्यात पावती फाडण्याचे काम होते ती जागा त्याच्या कार्यकक्षेत येतील अशी तरतूद करणे बंधनकारक आहे.
3. भ्रमणध्वनी द्वारे पाठविण्यात येणा-या लघुसंदेश (SMS)-द्वारे वाहतुक पासेसची माहिती सर्व्हरवर अपलोड करावी लागेल व त्याद्वारे एक अद्‌वितीय इन्वाईस क्रमांक तयार होईल.

4. वाहतूक परवाना प्रणालीची प्रस्तावित कार्यपद्धती.

जिल्हा खनिकर्म अधिकारी वाहतूक पासेस ठेकेदारास देते वेळी त्या सर्व पासेसची नोंद संबंधित परवानाधारकाच्या नावांवर सर्व्हरवर करतील. वाहतूक पासेसचे परिमाण अगोदर ठरविलेले असेल व परवानाधारकास द्यावयाच्या पासेसची एकुण संख्या रेतीगटाच्या परिमाणा एवढी असेल. रेतीची वाहतूक करताना वाहनाच्या क्षमते नुसारच वाहतूक परवाना पासेस देणे लिलावधारकावर बंधनकारक राहील.

जेंव्हा वाहतूक पासेस स्कॅन करुन सर्व्हरवर अपलोड करण्यात येतील तेंव्हा त्या बारकोड साठी एक अद्वितीय इन्वाईस क्रमांक मिळेल व त्याची ठराविक वैधता असेल ज्यामुळे परवानाधारकाने उत्खनन केलेली सर्व माहिती सर्व्हरवर मिळू शकेल. वाहतूक पासेसचा दुबार वापर करता येणार नाही याबाबतची संपुर्ण जबाबदारी परवानाधारकाची राहील.

5. वाहतूक मार्गावर वाहनांची तपासणी -

महसूल कर्मचारी वाहतुक पासेसची वैधता संकेतस्थळ, अँड्रॉईड बेस्ड अॅप्लीकेशनव एसएमएस चा वापर करुन निश्चित करतील.

6. वाहन बिघाड नोंदविण्यासाठी -

रेती वाहतूक करणा-या वाहनांबाबतची माहिती तात्काळ मिळण्यासाठी कॉल सेंटरची सोय परवानाधारकास स्वखर्चाने करावी लागेल; जेणेकरुन रेती वाहतूक करणा-या वाहनामध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाल्यास, त्या वाहनाची दुरुस्ती करण्यास लागलेल्या वेळे एवढी वैधता वाढवून घ्यावयाची झाल्यास वाहन धारक तात्काळ त्याबाबतचा विहीत स्वरुपाचा एसएमएस किंवा फोन करुनकॉल सेंटरला कळवील तसेच वाहन सुरु झाल्यानंतर देखील त्याबाबतची माहिती तात्काळ कॉल सेंटरला कळवली जाईल.

24) रेल्वे पुल व रस्ते पुलाच्या कोणत्याही बाजूने 600 मीटर्स (2000 फूट) अंतराच्या आत रेतीचे उत्खनन करता येणार नाही.

25) महाराष्ट्र शासनाच्या दि. 21/05/2015 रोजीच्या धोरणानुसार ज्या व्यक्ती/संस्थांना परवाना देण्यात येईल त्या त्या वेळी प्रत्येक व्यक्ती/संस्थेकडून त्यांना देण्यात आलेल्या वाळू/रेती परिमाणाच्या दराप्रमाणे एकूण रक्कमेच्या किंमतीवर महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचे कडील जल सर्वेक्षण शुल्क 10% तसेच 10% जल सर्वेक्षण शुल्कावर 18 % जीएसटी (वस्तू व सेवाकर) रक्कमही जलआलेखक सर्वेक्षण शुल्कापोटी (हायड्रोग्राफीक सर्वे फी) "Hydrographer, Maharashtra Meritime Board, Mumbai" यांच्या नांवाने काढलेला धनाकर्ष जमा करणे परवानाधारकास अनिवार्य राहिल. केंद्र शासनाने दिनांक 1 जुलै, 2017 पासून करप्रणाली बाबत नवीन धोरण निर्गमीत केलेले आहे, त्यानूसार आकारले जाणारे कर, टी.सी.एस. 2.06 % जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी **(D.M.F.)**, 10 % व पर्यावरण शुल्क 2 % या रकमा संबंधीत परवानाधारकास भरणे अनिवार्य आहे.

26) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांजकडील पत्र जा.क्र.ममेबो/मुकाअ/जआ/टी-94 /हातपाटी/रत्नागिरी/2017-18/809 दिनांक 04/09/2017 व जा.क्र.ममेबो/मुकाअ/जआ/टी-94/हातपाटी उत्खनन/ रत्नागिरी/2018-19/981 दिनांक 06/10/2018 मधील अटी व शर्ती -

i. उत्खननावेळी रेती व्यतिरीक्त निघालेली माती, खडे इत्यादी खाडी/नदीमध्ये किंवा तटीय विनियमन क्षेत्रात टाकू नयेत. अशा प्रकारची रेती व्यतिरीक्त माती, गाळ, खडे हे लहान खड्डे भरण्यासाठी व रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी वापरावेत.

ii. तटीय विनियमन क्षेत्रामध्ये मजुरांची निवासी छावणी, यांत्रिक सामग्री व साहित्य साठवणुकीस परवानगी दिली जाणार नाही.

iii. या ठिकाणी निर्माण होणारे सांडपाणी खाडीपात्रात सोडता कामा नये.

iv. सांडपाणी प्रक्रियेसाठीची यंत्रणा तटीय विनियमन क्षेत्राच्या बाहेर उभारण्यात यावी.

v. कांदळवनाचा नाश केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

vi. खाडीपात्रामध्ये भराव टाकला जाणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

vii. थोडया प्रमाणात पाणी गढूळ झाले तरी सागरी जीवांच्या चयापचय क्रियेत व प्रजननामध्ये अडथळे निर्माण होत असल्याने वाळू काढताना सागरी वातावरणाचे नुकसान होणार नाही याबाबत खबरदारी घ्यावी.

viii. काढलेल्या रेतीची वाहतुक व साठवणुक करताना नदी/खाडीच्या किनाऱ्यावरील पर्यावरण संतुलन बिघडणार नाही याची दक्षता घ्यावी.

ix. कांदळवनाच्या संरक्षणासाठी व सागरी पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी आवश्यक ती विशेष काळजी घ्यावी.

x. इतर संबंधित विभागांच्या आवश्यक त्या परवानग्या घेतल्यानंतरच रेती उत्खनन सुरु करावे.

xi. पावसाळी हंगामामध्ये परवानाधारकाने खालील नमूद केलेल्या मुद्यांचे पालन करावे.

(a) परवानाधारक हे नदी/खाडी पात्रामध्ये उत्खनन करणार असल्याने त्यांनी खुल्या समुद्रामध्ये जाऊ नये.

(b) उत्खनन कालावधीत पावसाळी हंगाम असल्यामुळे ज्यावेळी हवामान खात्याकडून अतिवृष्टी/खराब हवामानाचा इशारा दिला जाईल, त्यावेळी परवानाधारकाने उत्खनन करु नये.

(c) उत्खनन कालावधी हा पावसाळी असल्यामुळे उत्खनन साधनांचे तसेच इतर बाबींचे नुकसान/अपघात झाल्यास सर्वस्वी जबाबदारी ही परवानाधारकाने असेल.

xii. शासन निर्णय दिनांक 21/05/2015 च्या निर्गती धोरणामध्ये नमुद असलेल्या मुदयानुसार उत्खनन विषयक कार्यवाही करताना धोरणातील अटी व शर्ती (परिच्छेद C-1) व जोडपत्र (अ) चे काटेकोरपणे पालन करावे.

xiii. <u>केंद्र शासनाच्या MOEF & CC विभागाच्या दिनांक 08/11/2011 च्या अधिसूचनेप्रमाणे जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या सात सदस्य समितीच्या बैठकीमध्ये प्रस्तावित हातपाटी उत्खननास देण्यात येणा-या परवानगीच्या निर्णयाला पर्यावरण दृष्टया महाराष्ट्र सागरी किनारपटटी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाची (MCZMA) आवश्यकता असल्यास मान्यता घेण्यात यावी.</u>

xiv शासन निर्णय दिनांक 21/05/2015 च्या निर्गती धोरणातील परिच्छेद C-1 (3) मध्ये नमुद असल्याप्रमाणे परवानाधारकाने त्याला मंजूर केलेल्या वाळू गटाच्या ठिकाणी फलक/बोर्य लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन गटाची सिमा दर्शविणारे बॉय (Buoy) टाकणे अनिवार्य

राहिल. गटाच्या सिमांकन करीता परवानाधारकाने बॉय उपलब्ध करुन दिल्यास जलआलेखक, कार्यालयाकडून जीपीएस उपकरणाद्वारे गटाची भौगोलिक स्थिती (Latitude & Longitude) प्रत्यक्ष स्थळी दर्शविण्यात येईल. त्याकरीता शासन गृहविभाग अधिसूचना दिनांक 24/05/2016 अन्वये निश्चित केलेले सर्व्हेक्षण शुल्क प्रतिदिन रु. 58,000/- प्रमाणे लागणा-या कालावधीचे सर्व्हेक्षण शुल्क आकारले जाईल. परवानाधारकाने सर्व्हेक्षण शुल्क भरणा केल्यानंतरच उप गटांचे सिमांकन निश्चित करुन देण्यात येईल. **उपगटाची परिसीमा बॉय (Buoy) टाकून निश्चित केल्याशिवाय परवानाधारकास उत्खननाचे आदेश दिले जाणार नाहीत.**

xv. परवानाधारकाकडून ज्या क्षेत्रात उत्खनन करण्यात येणार आहे ते क्षेत्र ज्या बंदर हद्दीत येईल, त्या संबंधित बंदर निरिक्षक/सहाय्यक बंदर निरिक्षक, महाराष्ट्र सागरी मंडळ कार्यालयाकडून "चढणावळ व उतरणावळ शुल्क" (Landing & Shipping fees) लिलावधारकाकडून भरणा करणे अनिवार्य राहील.

***विशेष निर्देश व अटी व शर्ती***

1. प्रत्येक वाळू साठयापासून बाहेर निघण्यासाठी महसूल विभागाकडून मान्यता देण्यात येईल तेवढेच आत येण्याचे **(EntryRoute)** व बाहेर जाण्याचे मार्ग **(Exit Route)** असतील. हेच मार्ग वाहतुकीसाठी वापरणे बंधनकारक राहिल. **मान्यता देण्यात आलेल्या आत येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या मार्गांशिवाय** इतर मार्ग असल्यास ते बंद करावे लागतील.अशा ठिकाणांहून वाहतुक करणे शक्य होणार नाही,अशा प्रकारची आवश्यक ती सर्व उपाययोजना परवानाधारकाने स्वत: करावी. **उदा.** मोठे बोर्ड लावणे, च-या खोदणे इत्यादी परवानाधारकाने स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील. तसेच ज्या मार्गावर चेक पोस्ट लावण्यात येईल त्या ठिकाणावरुन वाहतूकीसाठीचे प्रत्येक वाहन जाणे बंधनकारक राहिल. मान्यता दिलेल्या मार्गाशिवाय इतर मार्गावर वाहतूक केल्याचे आढळून आल्यास सदर वाहतूक अवैध समजून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

2. प्रमाणित करुन दिलेल्या (Entry/Exit Route) मार्गावर Check Post लावून Flood Lights, CCTV, CCTV Footage Real time live streaming करणेसाठी ब्राडबॅड इंटरनेट सुविधा, संगणक, प्रिंटर, पॉवर बॅकअप इ. सुविधा उपलब्ध् करण्यात येतील. तसेच Check Post वर 24 तास मॅनेजमेंट करणेसाठी किमान तीन कर्मचारी नेमणेत येतील. उपरोक्त बाबींसाठी आवश्यक असणारा खर्च व **एकापेक्षा जास्त वाळू गटासाठी एकत्रित चेक पोस्ट (अथवा एकापेक्षा जास्त चेक पोस्ट) लावणेची आवश्यकता असल्यास सर्व चेक पोस्ट वर वरील प्रमाणे होणारा खर्च विभांगून सर्व संबंधित परवानाधारक यांच्याशी चर्चा करुन जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी स्तरावर निश्चित केला जाईल. असा निश्चित केलेला खर्च परवानाधारक यांना भरावा लागेल. याबाबत जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.**

3. वाळु उत्खननाचा व पावती पुस्तकाचा हिशोब वेळच्या वेळी न देणे. परवानाधारकाकडे असलेल्या पावतीच्या स्थळप्रती मध्ये आणि वाहतुक करणा-या वाहन चालकाच्या पावतीच्या प्रतिमध्ये तफावत असणे, इ.बाबीसुद्धा शर्तभंग समजण्यात येतील. अशा बाबी निर्दशनास आल्यास संबंधित परवानाधारकांचा परवाना रद्द करण्यात येईल.

**4.** याशिवाय जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी वेळोवेळी ठरवतील त्या अटी व शर्ती, तसेच अवैध वाळू वाहतूक थांबविणेसाठी देण्यात येणा-या सूचना/उपाययोजना संबंधित ठेकेदारांने स्वखर्चाने करणे बंधनकारक राहिल.

**5.** शासन निर्धारीत करील ती संगणकीय प्रणाली ठेकेदारांना वापरणे बंधनकारक राहील आणि त्यासाठी आवश्यक **Hardware** आणि इतर सुविधा स्वखर्चाने ठेकेदाराला कराव्या लागतील.

**6.** कोणत्याही अटी व शर्तीचा एकदा देखील भंग झाल्यास जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांना परवाना रद्द करणे व इतर कायदेशीर कारवाई करणे कायदेशीर राहील. तसेच एकापेक्षा अधिक अटीचे उल्लघंन करणा-या परवानाधारकास **BLACKLIST** करणेबाबत **जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी स्तरावर उचित निर्णय घेण्यात येईल.**

**7. कोणतेही कारण न देता वाळू उत्खनन परवाना रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांनी राखीव ठेवला आहे.**

सही/-xxx

स्थळ :- रत्नागिरी.
दिनांक :- 23/01/2019

(सुनील चव्हाण)
**जिल्हाधिकारी रत्नागिरी.**